(69)

G20

**कार्यालय, नागपूर महानगरपालिका, नागपूर**
(सामान्य प्रशासन विभाग)
महानगरपालिका मार्ग, सिव्हील लाईन्स, नागपूर - ४४०००१
**Email Id – gadnmcnagpur@gmail.com**

पत्र क्र. :- साप्रवि/ वि.स.अता/१३/२०२३ दिनांक:- १८/०९/२०२३

**विधानमंडळ कामकाज/ कालमर्यादा /अति-तातडीचे**

प्रति,

मा. सहाय्यक आयुक्त,
अतिक्रमण विभाग
महानगरपालिका नागपूर.

विषय :- विधानसभा अतारांकित प्रश्न क्र.६१९८६
''नागपूर जिल्हायातील मौजा चिखली (देवस्थान) तुलसीनगर,शांतीनगर येथे म्हाडाच्या जागेवर झालेल्या अतिक्रमण ''.

संदर्भ :- १) नगर विकास विभाग यांचे पत्र क्र.अनौसं-२०२३/प्र.क्र.१६९/नवि-२६ दिनांक:-१४/०९/२०२३.

महोदय,

उपरोक्त संदर्भांकित विषयाचे अनुषंगाने आपणांस कळविण्यात येते की, विधानसभा अतारांकित प्रश्न क्र. ६०९२९ मा.डॉ.श्री. नितिन राऊत (नागपूर उत्तर) व ईतर यांनी उपस्थित केलेला असुन सदर विषय हा आपल्या विभागाशी संबंधित असल्यामुळे पाठविण्यात येत आहे. स्वयंस्पष्ट अहवाल, पुरक टिप्पणीसह ud२०.urban-mh@mah.gov.in व vidya.hampayy@nic.in शासनाच्या संकेतस्थळावर पाठवण्यात यावी, तसेच पाठवण्यात येणाऱ्या उत्तराची एक प्रत gadnmcnagpur@gmail.com या ईमेलवर प्रत सुलभ माहितीसाठी या कार्यालयास पाठविण्याची विनंती आहे.

सहपत्र :- संदर्भिय पत्र

सहाय्यक अधिक्षक
सामान्य प्रशासन विभाग
महानगरपालिका नागपूर

O/C
18/9/23

प्रतिलीपी :-

१) मा. उपायुक्त, साप्रवि, म.न.पा. नागपूर यांना माहितीस्तव सादर.
२) मा. सहा. आयुक्त साप्रवि, म.न.पा. नागपूर यांना माहितीस्तव सादर.

# महाराष्ट्र शासन

नगर विकास विभाग

४ था मजला, मुख्य इमारत, हुतात्मा राजगुरू चौक, मंत्रालय, मुंबई - ४०० ०३२

दुरध्वनी क्र.-२२७९४२०६ Email ID :- ud26.urban-mh@mah.gov.in

९८७०२४७०२४ vidya.hampayya@nic.in


---

**क्रमांक :- अनौसं-२०२३/प्र.क्र.१६९/नवि-२६** **दिनांक :-१४/९/२०२३**

प्रति,

आयुक्त,
नागपूर महानगरपालिका,
नागपूर.

**विषय :- विधानसभा अतारांकित प्रश्न क्र.६१९८६**
" नागपूर जिल्ह्यातील मौजा चिखली (देवस्थान) तुलसीनगर, शांतीनगर येथे म्हाडाच्या जागेवर झालेले अतिक्रमण..."
सन्मा. डॉ.श्री.नितिन राऊत व इतर वि.स.स.

**संदर्भ :-** प्रधान सचिव, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय,
विधान भवन, मुंबई यांचे पत्र क्रमांक-निरंक/ ब कक्ष दि.२७ एप्रिल, २०२३

महोदय,

उपरोक्त विषयाबाबत सन्मा. डॉ.श्री.नितिन राऊत व इतर वि.स.स. यांनी उपस्थित केलेल्या प्रश्नाची प्रत सोबत जोडली आहे. त्यानुसार आवश्यक त्या कागदपत्रांसह स्वयंस्पष्ट अहवाल PDF Format व Word File (Sakal Marathi) मध्ये तात्काळ ud२६.urban-mh@mah.gov.in व vidya.hampayya@nic.in या Email- Id वर पाठविण्यात यावा, ही विनंती.

**आपला,**

**सोबत :- वरील प्रमाणे**

**(अनिल र. काटकर)**
**कक्ष अधिकारी, महाराष्ट्र शासन**

११५|१

क्रमांक - _____ / व कक्ष
महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय
विधान भवन, मुंबई/नागपूर
दिनांक - २७-०४-२०२३

प्रति,
सचिव
गृहनिर्माण विभाग
महाराष्ट्र शासन मंत्रालय, मुंबई - ४०० ०३२

महोदय,

खालील उदधृत केलेला विधानसभा अतारांकित प्रश्न माननीय अध्यक्षांनी स्वीकृत केला आहे. सदरहू प्रश्नाचे उत्तर महाराष्ट्र विधानसभा नियम ७२ (२) अन्वये तीस दिवसांच्या आत म्हणजे दिनांक २१ मे, २०२३ पावेतो या सचिवालयास पाठविण्यात यावे –

प्रत माहितीसाठी सादर अग्रेषित –
(१) माननीय मुख्यमंत्री
(२) माननीय उप मुख्यमंत्री
(३) सर्व संबंधित सदस्यांना

आपला

प्रधान सचिव
महाराष्ट्र विधानसभा

---

**नागपूर जिल्ह्यातील मौजा चिखली (देवस्थान) तुलसीनगर, शांतीनगर येथे म्हाडाच्या जागेवर झालेले अतिक्रमण**

अतारांकित प्रश्न क्रमांक ६११८६ डॉ. नितिन राऊत (नागपूर उत्तर), श्री. बाळासाहेब थोरात (संगमनेर), श्री. सुरेश वरपुडकर (पाथरी), ॲड. यशोमती ठाकूर (सोनावणे) (तिवसा), प्रा. वर्षा गायकवाड (धारावी), श्री. अमिन पटेल (मुंबादेवी), श्री. अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री. विकास ठाकरे (नागपूर पश्चिम)

सन्माननीय उप मुख्यमंत्री पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नागपूर जिल्ह्यातील पंतप्रधान आवास योजना खसरा क्रमांक ४१ मौजा चिखली (देवस्थान) तुलसीनगर, शांतीनगर येथील म्हाडाच्या जागेवर अतिक्रमण केल्याचे माहे जानेवारी २०२३ च्या शेवटच्या आठवडयात निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सन २०१४ मध्ये हे भूखंड नियमित करण्यास नकार देणाऱ्या नासुप्रने सन २०१९ मध्ये ते नियमित केले आहे, हे खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन म्हाडाच्या जागेवर अतिक्रमण करणाऱ्या संबंधित दोषी अधिकाऱ्यांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

# कार्यालय, नागपूर महानगरपालिका, नागपूर
## सतरंजीपूरा झोन क्र.7
## (सहाय्यक आयुक्त/वार्ड अधिकारी यांचे कार्यालय)
दुरध्वनी क्र. 7030577650


क्रमांकः– Z-7/AC/P-289 दिनांक : 18/9/2023

**प्रति,**

कक्ष अधिकारी,
नगर विकास विभाग,
महाराष्ट्र शासन चौथा माळा,
मुख्य इमारत, हुतात्मा राजगुरू चौक,
मंत्रालय मुंबई–400032.

**विषयः**– विधानसभा अतारंकित प्रश्न क्र. 61986
नागपूर जिल्हातील मौजा चिखली (देवस्थान) तुलसीनगर, शांतीनगर येथे म्हाडाच्या जागेवर झालेले अतिक्रमण..........
सन्मा. डॉ नितीन राऊत व इतर वि.स.स.

**संदर्भः**– कक्ष अधिकारी, नगरविकास विभाग यांचे पत्र क्र. अनैसं–2023/प्र.क्र. 169/नवि–26 दि. 14/09/2023.

उपरोक्त विषयाकिंत अतारंकित प्रश्न क्र. 61986 चा अहवाल खालीलप्रमाणे देण्यात येत आहे,

| | |
|---|---|
| नागपूर जिल्हातील पंतप्रधान आवास योजना खसरा क्र. 49 मौजा चिखली (देवस्थान) तुलसीनगर, शांतीनगर येथील म्हाडाच्या जागेवर अतिक्रमण केल्याचे माहे–जानेवारी 2023 च्या शेवटच्या आठवडयात निर्देशनात आले हे खरे आहे काय? | सदरील बाब नागपूर सुधार प्रन्यास व म्हाडा यांचेशी संबंधित आहे. नागपूर महानगरपालिका नागपूर शी संबंधित नाही. |
| असल्यास सन–2014 मध्ये हे भुखंड नियमीत करण्यास नकार देणाऱ्या नागपूर सुधार प्रन्यास ने सन–2019 मध्ये ते नियीमत केले आहे, हे खरे आहे काय ? | लागू नाही. |
| असल्यास उक्त प्रकरणे शासनाचे चौकशी करून म्हाडाच्या जागेवर अतिक्रमण करणाऱ्या संबंधित दोषी अधिकाऱ्यावर कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे. | लागू नाही. |
| नसल्यास विलंबाची कारणे काय आहे ? | लागू नाही. |

Pandhare

सहा. आयुक्त,
सतरंजीपुरा झोन क्र. 7
म.न.पा. नागपुर

557C:\Users\Z07Health2\Desktop\PWD\pwd\letter 2022-23 (Repaired) (Autosaved)1.docx